बृहन्मुंबई महानगरपालिका

लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय, शीव, मुंबई - २२

क्र. लोटीरू./ /अधिष्ठाता, दिनांक:-

# जाहिरात

.................................

लो. टि. म स . रुग्णालय व वैदकीय महाविद्यालयातील बालरोग चिकित्सा या विभागातील " टेलिमेडिसिन " या संवर्गातील खालील नमुद केलेले पद भरण्याचे प्रस्तावित आहे• सदर रिक्त पद तदर्थ तत्वांवर एकावेळी तीन महिन्यांपेक्षा जास्त नाही इतक्या कालावधीकरिता प्रत्येक तीन महिन्यांपुर्वी एक दिवस सेवाखंड देऊन पुर्ननेमणूक अशा स्वरूपात अर्हताधारक उमेदवाराकडून वॉक-इन-सिलेक्शन पद्धतीने भरण्यात येणार आहे प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे.

उमेदवारांनी अर्जासह लो. टि. म स . रुग्णालय व वैदकीय महाविद्यालय, पेडिऍट्रिक ऑफिस कॉलेज बिल्डिंग पहिला माळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, शीव, मुंबई ४०० ०२२, दिनांक १४.०६.२०२१ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष मुलाखतीकरिता (walk-in-interview) उपस्थित राहावे. उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्रे व झेरॉक्स प्रती मुलाखतीच्यावेळी आणणे जरुरीचे आहे.

**पदांचा तपशील :-**

| पदांचे नाव | प्रतिमहा ठोस वेतन | शैक्षणिक व अनुभव अर्हता | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|
| पोषण वैधकीय अधिकारी | ६०,०००/- | एम. डी. (बालरोगतज्ज्ञ ) डी. एन . बी (बालरोगतज्ज्ञ ) किंवा डी.सी एच पदवी, बालरोग व पीड़ियाट्रिक न्युट्रीशन मध्ये १ वर्षाचा अनुभव | १ |

**शैक्षणिक अर्हता:-** उमेदवार महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. तसेच मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदव्यूत्तर पदविका, सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या जसे कि, शैक्षणिक (गुणपत्रिका व प्रमाणपत्रे), एम. एस. सी. आय.टी. उत्तीर्ण असण्याचे प्रमाणपत्र, मराठी विषय घेऊन एस. एस. सी. परीक्षा उत्तीर्ण, इ. च्या प्रमाणित प्रतिलिपी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**अनुभव:-** मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयातील/ रुग्णालयातील पदाचा अनुभव

सदर नियुक्ती तदर्थ तत्वांवर एकावेळी तीन महिन्यांपेक्षा जास्त नाही, इतक्या कालावधीकरिता प्रत्येक तीन महिन्यांपुर्वी एक दिवस सेवाखंड देऊन पुर्ननेमणूक अथवा महानगरपालिका तर्फे निवड मंडळामार्फत अर्हताधारक उमेदवार उपलब्द होईपर्यंत यापैक जे अगोदर होईल अशा स्वरूपात करण्यात येईल.

**वयाची अट :-** सर्वसाधारण उमेदवारकरीता वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा अधिक नसावे व मागास्वर्गीयांकरता ४३ वर्षापेक्षा अधिक नसावे. उच्च गुणवत्ता आणि अनुभवी उमेदवारांच्या बाबत वयाची उच्चतम मर्यादा शिथिल करण्यात येईल.

सदर नियुक्ती निव्वळ तदर्थ तत्त्वांवर असल्यामुळे नियुक्ती करण्यांत येणाऱ्या उमेदवारांना निवृतीवेतन योजना व भविष्यनिर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा ) नियम १९८९ व मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम १९९९ लागू होणार नाही.

5/6/2021

डॉ. मोहन जोशी
अधिष्ठाता
लो. टि. म स . रुग्णालय, शीव.

Scanned with CamScanner